# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नागपूर

जाहिरात

दिनांक :२६.०८.२०२४

या संस्थेतील विविध विषयातील सहाय्यक प्राध्यापक यांची रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसासाठी उमेदवारांकडून भरण्यास पृथक अर्ज मागविण्यात येत आहे. अर्जाचे कोरे नमुने दिनांक २९.०८.२०२४ ते ०९.०९.२०२४ पर्यत वेळ १०.३० ते ५.०० पर्यत उपलब्ध आहे अर्ज स्विकारण्याचा शेवटचा दिनांक ०९.०९.२०२४ पर्यत स्विकारण्यात येईल. नियम व अटी अर्जासोबत उपलब्ध आहेत. सदर जाहिरात www.gmcnagpur.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ क्र. | विषयवार | एकूण रिक्त पदे | अजा | अज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | इमाव | विमाप्र | आर्थीक दृष्टया दुर्बल घटक | खुला | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शरिरक्रियाशास्त्र | ४ | ० | १ | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | एम.एस |
| २ | जीवरसायनशास्त्र | ६ | १ | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | १ | २ | एम.डी. |
| ३ | औषधनिर्माणशास्त्र | ४ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | एम.डी. |
| ४ | सुक्ष्मजीवशास्त्र | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | एम.डी. |
| ५ | विकृतीशास्त्र | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ | एम.डी. |
| ६ | न्यायवैद्यकशास्त्र | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | १ | १ | एम.डी. |
| ७ | पी.एस.एम.विभाग | ५ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | १ | एम.डी. |
| ८ | औषधवैद्यकशास्त्र | १२ | १ | १ | १ | ० | ० | ० | ३ | ० | २ | ४ | एम.डी. |
| ९ | शल्यचिकित्साशास्त्र | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | एम.एस |
| १० | कान, नाक, घसा | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | एम.एस |
| ११ | नेत्रशल्यचिकित्सा | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | एम.एस |
| १२ | बधिरीकरणशास्त्र | ५ | ० | १ | ० | १ | ० | ० | १ | ० | १ | १ | एम.डी. |
| १३ | क्ष-किरणशास्त्र | ३ | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | एम.डी. |
| १४ | स्त्रीरोग व प्रसुति | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | एम.एस. |
| १५ | अस्थिव्यंगोपचार | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | एम.एस |
| १६ | सुघटनशल्यचिकित्सा | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | एम.एस |
| १७ | रेडिओथेरेपी | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | एम.डी. |
| १८ | भौतिकोपचारशास्त्र | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | एमपी टीएच |
| १९ | व्यवसायोपचारशास्त्र | २ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | एमओ टीएच |
|  | एकूण | ६१ | ७ | ६ | ४ | २ | ० | ० | ११ | ० | १२ | १९ |  |

## शा.वै.म.व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर

| अ क्र. | विषयवार | एकूण रिक्त पदे | अजा | अज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | इमाव | विमाप्र | आर्थीक दृष्टया दुर्बल घटक | खुला | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रुग्णालय प्रशासन | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | एम.डी. |
| २ | नेफ्रोलॉजी | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | डी.एम. |
| ३ | ग्रस्ट्रोऍन्टालॉजी | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | डी.एम. |
| ४ | क्ष-किरणशास्त्र | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | एम.डी. |
| ५ | बधिरीकरणशास्त्र | ४ | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | २ | एम.डी. |
| ६ | जीवरसायनशास्त्र | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | एम.डी. |
| ७ | सी.व्ही.टी.एस. | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | एमसीएच |
| ८ | विकृतीशास्त्र | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | एम.डी. |
| ९ | सायटॉलाजी | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | एम.डी. |
| १० | रक्तपेढी | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | एम.डी. |
| ११ | इंडोक्रोनॉलॉजी | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | डी.एम. |
| | एकूण | १९ | ७ | ० | १ | ० | ० | ० | २ | ० | ० | ९ | |

## ट्रामा केअर सेंटर, नागपूर

| अ क्र. | विषयवार | एकूण रिक्त पदे | अजा | अज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | इमाव | विमाप्र | आर्थीक दृष्टया दुर्बल घटक | खुला | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विकृतीशास्त्र | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | एम.डी. |
| २ | बधिरीकरणशास्त्र | ५ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | २ | एम.डी. |
| ३ | अस्थिव्यंगोपचार | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | एम.एस. |
| | एकूण | ८ | २ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ४ | |

या पदासाठी मुलाखत दि.१३.०९.२०२४ रोजी ठिक ३.०० वाजता अधिष्ठाता यांचे दालनात ठेवण्यात आली आहे. मुलाखतीस उपस्थित राहण्याकरिता कोणताही प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही. मुलाखतीसाठी स्वतंत्र पत्र पाठविण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. सेवेत असलेल्या उमेदवारांनी अर्ज संस्था प्रमुखामार्फत सादर करावे. नॅशनल बोर्ड ऑफ एक्झमिनेशनची डी.एन.बी./एम.एस/एम.डी. समतुल्य आहे. उपरोक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात भरावयाचे असल्याने उमेदवाराच्या नियमित पदासाठी कोणताही हक्क राहणार नाही.

वरील जाहीराती मधील पदांच्या संख्येत कमी अधिक करण्याचा व तसेच निवड समीती मार्फत निवड झालेल्या उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्याचे अथवा प्रलंबित ठेवण्याचे अथवा नियुक्ती रद्द करण्याचे अथवा सदर जाहीरात रद्द करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांना असतील.

**वेतन श्रेणी** :- करार तत्वावर मानधन रु.१,००,०००/- अनुज्ञेय राहील.

**वयोमर्यादा** :- खुला वर्ग ४० वर्ष, मागासवर्गीयांकरिता ४५ वर्ष

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नागपूर

प्रत माहिती करिता सादर :-

१) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.

२) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, ......................

## शर्ती व अटी

विषय :- स्थानिक निवड समितीमार्फत (डी.एस.बी.)तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसासाठी सहाय्यक प्राध्यापक यांची पदे भरण्याबाबत.

१) **अर्ज मागविण्याबाबत** :- जाहीरातीमध्ये दर्शविलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील सहाय्यक प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्यासाठी या जाहीरातीद्वारे आवश्यक ती अर्हता/पात्रता धारण करणाऱ्या बंधपत्रित उमेदवाराकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

२) **अर्हता/पात्रतेबाबत** :-

i. सर्व विषयातील सहाय्यक प्राध्यापक पदासाठी शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मुंबई यांचे क्र. डीएसबी-१२०१/प्र.क्र.२७६/२००१/वैसेवा-३,दि.२७.२.२००४ मधील तरतुदीनुसार उमेदवार बंधपत्रित असला पाहीजे व त्याने संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम यशस्वीरित्या पुर्ण केलेला असला पाहिजे.

ii. पदव्युत्तर अभ्यासक्रम उत्तीर्ण झाल्याची नोंद उमेदवाराच्या महाराष्ट्र मेडीकल कौन्सीलच्या अथवा इंडियन मेडीकल कौन्सीलच्या नोंदणी प्रमाणपत्रावर झालेली असावी.

iii. मुलाखतीच्या दिनांकास अर्जदाराने विहीत अर्हता/पात्रता धारण केलेली असली पाहीजे.

३) **वयोमर्यादा** :- सहाय्यक प्राध्यापकांच्या सर्व पदांकरिता खुल्या वर्गातील उमेदवारांसाठी उमेदवार ४० वर्षाहुन अधिक वयाचा नसावा. मात्र मागासवर्गीय उमेदवारांसाठी वयोमर्यादा ४५ वर्षापर्यत शिथीलक्षम राहील.

४) **वेतनश्रेणी** :- वरील पदांची वेतनश्रेणी शा.नि.क्र.वेतनी-२०१९/प्र.क्र.०३/२०१९/वैसेवा-२ दि.३१.१२.२०२० अन्वये **रुपये १०००००/- ठोक मानधन** अनुज्ञेय राहील.

५) **अंतिम दिनांक** :- अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक दि.०९.०९.२०२४ पर्यत राहील.(वेळ ५.०० पर्यत)

६) **अर्ज सादर करण्याबाबत** :-

१) विहीत नमुन्यात संपुर्णपणे व योग्य तऱ्हेने भरलेले अर्ज आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायाप्रतिसह वर उल्लेख केलेल्या अंतिम दिनांकापुर्वी व वेळेपूर्वी या महाविद्यालयात प्रत्यक्ष सादर करणे. तसेच अपूर्ण भरलेले, प्रमाणपत्रांच्या साक्षाकिंत छायाप्रति सोबत नसलेले अर्ज स्विकारले/विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

२) जे उमेदवार या अगोदरच या महाविद्यालयात / रुग्णालयात अथवा अन्यत्र शासकीय/खाजगी सेवेत असतील त्यांनी त्यांचे विहीत नमुन्यातील भरलेले अर्ज त्यांच्या विभागामार्फत /संस्थेमार्फतच तसेच संबंधित विभाग प्रमुखांच्या/संस्था प्रमुखांच्या ना हरकत प्रमाणपत्र या कार्यालयास अंतिम दिनांकापुर्वी सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी परस्पर या कार्यालयास अर्ज सादर केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

३) ज्या उमेदवारांनी या अगोदर म्हणजे जाहिरात प्रदर्शित होण्याअगोदर साध्या कागदावर अर्ज केले असतील त्यांनी विहित नमुन्यातील अर्ज अंतिम दिनांकापुर्वी या कार्यालयास आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या सांक्षाकित प्रतिसह सादर करावा. पुर्वीचे साध्या कागदावरील अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

७) **विहीत नमुन्यातील अर्जाबरोबर सादर करावयाची कागदपत्रे** :-

**उमेदवाराने विहीत नमुन्यातील अर्ज योग्य तऱ्हेने व संपुर्ण भरल्यानंतर त्यासोबत पुढील कागदपत्रांच्या /प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायाप्रति खालील अनुक्रमाप्रमाणे सादर करणे बंधनकारक आहे.**

१) प्रथम, व्दितीय, तृतीय वर्ष एम.बी.बी.एस. उत्तीर्ण गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र.

२) एम.बी.बी.एस. प्रयत्नाचे प्रमाणपत्र.

३) पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण व गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र.

४) एम.डी./एम.एस. प्रयत्नाचे प्रमाणपत्र.

५) महाराष्ट्र मेडीकल कॉन्सीलचे नोंदणी प्रमाणपत्र.

६) जन्म तारखेचे प्रमाणपत्र / माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र.

७) जातीचे प्रमाणपत्र व जाती वैधता प्रमाणपत्र ज्या संवर्गासाठी नॉन-किमीलेयर प्रमाणपत्र आवश्यक आहे त्या संवर्गातल्या उमेदवारांना ते सादर करणे आवश्यक आहे.

८) अनुभवाचे प्रमाणपत्र. (वरिष्ठ निवासी म्हणून १ वर्ष अनुभव पुर्ण केले असावे.)

९) बंधपत्रित उमेदवार असल्याचे प्रमाणपत्र जोडून बंधपत्रित कालावधी कधी सुरु झाला पैकी किती कालावधीपुर्ण केला याबाबतीत योग्य ते पुराव्याचे कागदपत्रे जोडणे उमेदवारास बंधनकारक आहे. त्याशिवाय नियुक्ती देता येणार नाही.

जे उमेदवार खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस.परिक्षा उत्तीर्ण झालेले असतील व बंधपत्रित उमेदवार म्हणून दावा करीत असतील त्यांनी ते शासनाची करण्यास बधपत्रित असल्याचा पुरावा म्हणून प्रवेशावेळी त्यांनी संबंधित महाविद्यालयात सादर केलेंल्या बंधपत्राची सांक्षाकिंत प्रत संबंधित महाविद्यालयाकडून ते

८) **निवड प्रक्रियाबाबत :-** शासन निर्णय क्र.एलईसी-१४२४/प्र.क्र.२२८/वैसेवा-३, दि.१८.०७.२०२४ नुसार स्थानिक निवड मंडळामार्फत उमेदवाराची त्यांच्या गुणवत्तेनुसार व आरक्षणानुसार व उपलब्ध जागेनुसार तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसाकरिता निवड केली जाईल.

९) **उमेदवाराच्या निवडीबाबत प्राधान्य क्रम :-**

अ) शा.नि.क्र.डीएसबी-१२०१/प्र.क्र.२७६/२००१/वैसेवा-३, दि.२७.२.२००४ मधील तरतुदीनुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथून पदव्यूत्तर व पदवी अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या बंधपत्रित उमेदवारास निवडीमध्ये प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

ब) उपरोक्त निवडी नंतरही काही जागा शिल्लक राहिल्यास महाराष्ट्रातील अन्य शासकीय वैद्यकीय महाविद्यालया तून पदवीत्तर, पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या बंधपत्रित उमेदवारांच्या निवडीसाठी विचार केला जाईल

क) १) "ब" प्रक्रियेनतरही जागा शिल्लक राहील्यास महाराष्ट्रातील खाजगी महाविद्यालयातून पदव्युत्तर अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या **बंधपत्रित** उमेदवाराच्या निवडीसाठी विचार केला जाईल.

२) "ब" प्रक्रियेनंतरही जागा शिल्लक राहील्यास महाराष्ट्रातील खाजगी महाविद्यालयातून पदव्युत्तर अभ्यासक्रम पुर्ण केलेलया **अबंधपत्रित** उमेदवाराच्या निवडीसाठी विचार केला जाईल.

ड) "क" प्रकियेनंतरही काही जागा शिल्लक राहील्यास महाराष्ट्रा बाहेरील उमेवाराच्या गुणवत्तेनुसार निवडीसाठी विचार केला जाईल.

१०) **मुलाखतीबाबत :-**

१) **दिनांक १३.०९.२०२४ दुपारी ३.०० वाजता अधिष्ठाता, यांचे दालनात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर तसेच अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर, व ट्रामा केअर सेंटर, नागपूर येथील सहाय्यक प्राध्यापक पदासाठी उमेदवारांच्या मुलाखाती घेण्यात येईल. त्यासाठी कोणालाही वैयक्तिरित्या लेखी/तोंडी कळविले जाणार नाही.**

२) मुलाखतीस उशिरा आल्यास/गैरहजर राहील्यास अशा उमेदवारांचा विचार केला जाणार नाही व नंतर त्याबददल कोणतेही तक्रार/निवेदन स्विकारले/विचारात घेतले जाणार नाही.

३) उमेदवारांनी स्वखर्चाने दिलेल्या वेळेत व दिनांकास मुलाखतीसाठी सर्व मुळ कागदपत्रासह/ प्रमाणपत्रासह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

११) **प्रतिक्षा यादी बाबत :-** ज्या विषयासाठी जाहीर करण्यात आलेल्या पदापेक्षा अर्जदाराची संख्या जास्त असेल तर अशा ठिकाणी उर्वरित उमेदवारांना प्रतिक्षा यादीवर ठेवण्यात येईल. मात्र मुलाखतीस गैरहजर असणाऱ्या उमेदवारांचा त्यात समावेश केला जाणार नाही.

१२) **इतर अटी शर्ती :-**

१) शासनाचे सध्या अस्वित्वात असलेले नियम/अटी/शर्ती तसेच येथून पुढे अमंलात येणारे नियम/अटी/शर्ती निवड झालेल्या उमेदवारावर बंधनकारक असतील.

२) जे उमेदवार बंधपत्रित असतील त्यांनी बंधपत्रित सेवा पुर्ण करणे आवश्यक आहे. नियुक्ती मिळाल्यास त्यांना मध्येच नियुक्ती सोडावयाची झाल्यास बंधपत्र दंडाची रक्कम भरावी लागेल. त्याशिवाय त्यांना कोणतेही प्रमाणपत्र दिले जाणार नाही.

३) मागासवर्गीय उमेदवारांनी आवश्यक ती जात, जातवैधता, नॉन केमिलेअर, प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांचा विचार खुल्या प्रवर्गातील उमेदवार समजून केला जाईल याची नोंद घ्यावी.

४) उमेदवार विवाहीत असल्यास त्याला २ पेक्षा अधिक अपत्य नसावीत.

५) ज्या उमेंदवाराविरुध्द निवासी पदावर किंवा सहाय्यक प्राध्यापक पदावर कार्यरत असतांना शिस्तभंगाची कार्यवाही झाली असेल व त्याच्या सेवा समाप्त केल्या असतील अशा उमेदवारांच्या नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही.

१३) **रुजु अहवाल सादर करणेबाबत :-** निवड झालेल्या उमेदवारांनी त्यांच्या कामावर रुजु झाल्याचे अहवाल द्विप्रतित या कार्यालयास सादर करावेत. अन्यथा यांचे वेतन व भत्ते काढण्यास विलंब झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१४) **जाहिरातीमधील मजकुरात बदल करण्याबाबत :-** या जाहिरातीमधील कोणताही मजकुरात नियम/अटी /शर्ती/आरक्षण/पदसंख्या इ.मध्ये केव्हाही बदल करण्याचे अधिकार अधिष्ठातांनी राखुन ठेवले आहेत. तसेच एखादे पद भरणे अथवा रिक्त ठेवणे या बाबतचे अंतिम अधिकारही अधिष्ठाता यांना असतील.